महासत्ता एकच आवृत्ती

23 DEC 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव यंदा महागावात

## संत गजानन महाविद्यालयाला यजमानपद

दौ.हलकर्णी, ता.२३(वार्ताहर)-
...............................

शिवाजी विद्यापीठाचा या वर्षीचा मध्यवर्ती युवा महोत्सव महागाव (ता.गडहिंग्लज जि. कोल्हापूर ) येथील संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालयात दि. २७, २८ व २९ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवासाठी सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील तीन हजारहून अधिक विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. प्रथमच या विभागात युवा महोत्सव यजमानपदाचा मान या महाविद्यालयाला मिळाला आहे.

विद्यापिठ व महाविद्यालय याच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम होत आहे. गेल्या वर्षी कोरोनामुळे युवा महोत्सव ऑनलाईन झाला होता. यावर्षी मात्र कोरोना नियमाचे पालन करीत महोत्सव एकत्रीतपणे रंगमंचावर होणार असल्यामुळे युवा वर्गात जल्लोष आणि आनंदाला उधाण आले आहे.

सोमवार दि.२७ रोजी सकाळी १० वाजता महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यासाठी अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष अॅड.आण्णासाहेब चव्हाण तर प्रमुख पाहुणे म्हणून गोकुळचे संचालक शशिकांत पाटील-चुयेकर व गटविकास अधिकारी शरद मगर हे उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवात ३२ कलाप्रकारांचा समावेश असणार आहे. यामध्ये सांघिक व वैयक्तिक अशा दोन प्रकारात लोकनृत्य, लोककला, एकांकिका, पथनाट्य, समुहगीत, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, नकला, एकपात्री अभिनय, चित्रकला, छायाचित्र, वक्तृत्व स्पर्धा होणार आहेत. बुधवार दि. २९ रोजी समारोप समारंभासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, प्र.कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, गोकुळचे संचालक अजित नरके, मराठी मालिका अभिनेता लागीर झालं जी फेम राहुल मगदूम उपस्थित राहणार आहेत. महोत्सव यशस्वी होण्यासाठी महाविद्यालय व प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत व संयोजन समिती सचिव प्रा. व्ही. एम. पाटील यांनी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव यंदा महागावात

## 'संत गजानन'ला यजमानपद

**महागाव : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा यावर्षीचा मध्यवर्ती युवा महोत्सव महागाव (ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर) येथील संत गजानन महाराज आभियांत्रिकी महाविद्यालयात २७, २८ व २९ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवासाठी सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांतील तीन हजारांहून अधिक विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. प्रथमच या विभागात युवा महोत्सव यजमानपदाचा मान या महाविद्यालयाला मिळाला आहे.

सोमवारी (दि.२७) सकाळी १० वाजता महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष ॲड. अण्णासाहेब चव्हाण, तर प्रमुख पाहुणे म्हणून गोकुळचे संचालक शशिकांत पाटील-चुयेकर व गटविकास अधिकारी शरद मगर उपस्थित राहणार आहेत. या महोत्सवात ३२ कला प्रकारांचा समावेश असणार आहे. यामध्ये सांघिक व वैयक्तिक असे दोन प्रकारांत लोकनृत्य, लोककला, एकांकिका, पथनाट्य, समूहगीत, वाद-विवाद, प्रश्नमंजुषा, नकला, एकपात्री अभिनय, चित्रकला, छायाचित्र, वक्तृत्व स्पर्धेचा समावेश असेल.

बुधवारी (दि. २९) समारोप समारंभासाठी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र.कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, गोकुळचे संचालक अजित नरके, अभिनेते राहुल मगदूम उपस्थित राहणार आहेत. महोत्सव यशस्वी होण्यासाठी महाविद्यालय व प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. एच. सावंत व संयोजन समिती सचिव प्रा. व्ही. एम. पाटील यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांची यावर्षीही विविध नामांकित कंपन्यांनी चांगले पॅकेज देऊन निवड केली आहे. शिक्षण हे संशोधनासाठी मर्यादित न ठेवता त्याचा समाजहितासाठी उपयोग व्हावा, या उद्देशाने विद्यापीठाने तंत्रज्ञान अधिविभागाची स्थापना केली. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या अधिविभागात कॅम्पस इंटर्व्ह्यूचे आयोजन करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण व्हायच्या आधीच रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. विद्यार्थ्यांना तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. आर. के. यांचे मार्गदर्शन लाभले.